ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक,

ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्र

अंतर्गत संज्ञापन पत्र

प्रेषक : प्रमुख, ग्रंथालय

विषय : पुस्तक प्रदर्शन

धारिका : Lib/Exh/15-16

मा०
प्रति : कुलसचिव

दिनांक :१६/१०/२०१५

वाचन प्रेरणा दिनाच्या अनुषंगाने ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्राने केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पुस्तक प्रदर्शन | - | ०७ ते १५ ऑक्टोबर |
| २. | विद्यार्थ्यांसाठी तज्ञाची व्याख्याने | - | २१ व्या. शतकातील वाचन - डॉ. राजेंद्र वडनेरे<br>वाचनसवयी आणि शैक्षणिक उपयुक्तता - डॉ. राजेंद्र वडनेरे |
| ३. | प्रेरणा दिन उदघाटन | - | मा.कुलगुरू प्रा.डॉ. माणिकराव साळुंखे यांचे हस्ते |
| | कार्यक्रम | - | उपस्थिती कुलसचिव,डॉ. प्रकाश अतकरे डॉ.राजेंद्र वडनेरे, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा, डॉ. मधुकर शेवाळे , प्रमुख, ग्रंथालय विद्यार्थी आणि शिक्षक |
| ४. | कात्रणे | - | सोबत जोडल्या प्रमाणे |
| ५. | फोटोग्राफ | - | ई मेल ला पाठवले आहेत. |

M Shewale 16/10/15

O/C

डॉ.मधुकर शेवाळे

प्रमुख,ग्रंथालय

वाचन प्रेरणा दिन – सप्ताह अहवाल

भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती निमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये १३ ऑक्टोबर-वाचन प्रेरणा दिन म्हणुन साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने विद्यापीठ ग्रंथालयात ९ ते १४ ऑक्टोबर असा वाचन प्रेरणा दिन सप्ताह साजरा करण्यात आला.

दिनांक ९/१०/२०१७ रोजी ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्रामध्ये डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचेवरील व इतर वैविध्यपूर्ण पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्धघाटन करण्याचा मान मा.कुलगुरू महोदयांनी बी.बी.ए.विद्यार्थिनी आफरीन अली यांना दिला. प्रदर्शनपर मार्गदर्शन करतांना मा.कुलगुरू यांनी विद्यार्थी व शिक्षकांना संबोधित केले.मा.कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांनीही मार्गदर्शन केले.

दिनांक १०/१०/२०१७ रोजी वाचन प्रेरणा दिवस व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी साप्ताहिक नगाराचे संपादक प्रा.विनोद गोरवाडकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रा. गोरवाडकर यांनी वाचन संस्कृती या विषयावर व्याख्यान सादर केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ.राजेंद्र वडनेरे व्यासपीठावर उपस्थित होते.

दिनांक ११/१०/२०१७ रोजी वाचन प्रेरणादिन सप्ताहानिमित्त गंगापूर येथील दे.ना.पाटील माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सहलीचे नियोजन करून विद्यापीठ ग्रंथालयातील प्रदर्शनाला भेट घडवून आणली.तसेच विद्यार्थ्यांचे वाचन प्रेरणे संदर्भातील मनोगते कार्यक्रमात सादर करण्यात आली.यावेळी व्यासपीठावर नियोजन अधिकारी डॉ.हेमंत राजगुरू व प्र.जनसंपर्क अधिकारी श्री.संतोष साबळे हे उपस्थित होते.

दिनांक १२/१०/२०१७ रोजी बुक-टॉक चे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी श्री.दयानंद हातीब्रे,श्री.सचिन तरवटे,श्वेता जाधव व प्रेमलता दाभाडे यांनी सादरीकरण केले.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री.माधव पळशीकर ,संचालक,संगणक विद्याशाखा हे उपस्थित होते.तसेच डॉ.उमेश राजदेरकर हे ही व्यासपीठावर उपस्थित होते.

दिनांक १३/१०/२०१७ रोजी मा. डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. मा. कलाम साहेबांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.डॉ. सुनील कुटे , विभागप्रमुख व प्राध्यापक ,स्थापत्य अभियांत्रिकी विद्याशाखा,के.के.वाघ कॉलेज,नाशिक हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांचेसह निरंतर विद्याशाखेचे संचालक डॉ.राजेंद्र वडनेरे उपस्थित होते.डॉ.भोंडे यांनी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा आढावा घेऊन वैज्ञानिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीवर आपले विचार मांडले,व वाचनाचे महत्व स्पष्ट केले.डॉ.कुटे यांनी वाचन,वाचन संस्कृती आणि जीवन व उत्कर्ष यांचा संबंध जोडत उपस्थितांना वाचनाचे महत्व पटवून दिले.

ग्रंथालय प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे यांनी वाचन प्रेरणा दिन सप्ताह निमित्ताने झालेल्या कार्यक्रमांचा आढावा सादर करून प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. त्याचबरोबर दृक-श्राव्य विभागातील सर्व सहकारी, प्र.जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे, तसेच श्रीमती.प्राजक्ता देशमुख, श्री. राजेश बर्वे व ग्रंथालयातील सहकारी सहायक ग्रंथपाल श्री.प्रकाश बर्वे, श्रीमती ललिता टोपे, श्री.परशराम पालवी, श्री.अनंत जोशी यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी करता आला.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, संशोधक विद्यार्थी आय.टी.आय प्रशिक्षणार्थी, बी.बी.ए. व पीएच.डी. शिक्षणक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमासंदर्भातील वृत्तपत्रातील प्रसिद्धी, छायाचित्रे सोबत जोडली आहेत. कार्यक्रमांचे चित्रीकरण डीव्हीडी मध्ये देण्यात आलेले आहे.

डॉ.दिनेश भोंडे
कुलसचिव

दै. गावकरी.
दि. १६/१०/१५
पृ. पुरवणी १

LARC केंद्र ... नाशिक

# ज्ञानाच्या निर्मितीसाठी वाचन आवश्यक - डॉ. साळुंखे



। नाशिक ।

ज्ञानाची नवीन निर्मिती करण्यासाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानामुळेच राष्ट्राची प्रगती होते. ज्ञानातूनच समाजाची निर्मिती होते. वाद, प्रतिवाद आणि वाचन असल्याशिवाय ज्ञानाची निर्मिती शक्य नाही असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे प्रगत भारताचे स्वप्न साकारण्यासाठी त्यांचा जन्मदिन आज वाचन प्रेरणा दिन म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्रात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे, निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. राजेंद्र वडनेरे आणि ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे होत

प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे पुढे म्हणाले, साधारण पाचव्या शतकात चंद्रगुप्त, आर्य भट्टांनी ज्ञान संपादनाचे मोठे कार्य केले. यानंतर दहाव्या शतकात ज्ञानाची जेवढी निर्मिती भारतात झाली तेवढी कोठेही झाली नाही. दरम्यान तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात आर्यभट्टांच्या ज्ञान संपादनाला छेद देण्यात आला. परिणामी गरिबी मोठ्या प्रमाणात वाढल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. बदलत्या काळात निरनिराळ्या क्षेत्रात संशोधन होणे गरजेचे आहे. मात्र हे करताना, त्यात नाविन्यता असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना वाचनाचा छंद लागावा, यासाठी विविध कार्यक्रम राबविण्याच्या सूचना राज्य कुलगुरूंनी यावेळी केल्या. तद्वतच डॉ. कलाम यांच्या किमान एका पुस्तकाचे वाचन विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनीही करायला हवें असे ते म्हणाले. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश कसा शक्तिशाली होईल, असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम नेहमी करीत होते. त्यांच्या कामाची प्रेरणा प्रत्येकाने घ्यायला पाहिजे असेही कुलगुरू डॉ. साळुंखे यांनी शेवटी सांगितले.

प्रारंभी कुलगुरु प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनही भरविण्यात आले होते. डॉ. मधुकर शेवाळे यांनी सूत्रसंचालन करून शेवटी उपस्थितांचे आभार मानले. विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

दै. सकाळ
पृ. ३
दिनांक १६/१०/१५

महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ LARC केंद्र ज्ञानगंगोत्री, नाशिक

# ज्ञानाच्या निर्मितीसाठी वाचन आवश्यक : डॉ. साळुंखे

सकाळ वृत्तसेवा

## वाचन प्रेरणादिन



नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमापूजनप्रसंगी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे. शेजारी कुलसचिव प्रकाश अतकरे, डॉ. राजेंद्र वडनेरे, डॉ. मधुकर शेवाळे.

नाशिक, ता. १५ : ज्ञानाची नवीन निर्मिती करण्यासाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानामुळेच राष्ट्राची प्रगती होते. ज्ञानातूनच समाजाची निर्मिती होते. वाद, प्रतिवाद आणि वाचन असल्याशिवाय ज्ञानाची निर्मिती शक्य नाही, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणादिन म्हणून मुक्त विद्यापीठात साजरा झाला. त्यानिमित्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्रातील कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे, निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. राजेंद्र वडनेरे आणि ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे उपस्थित होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, की बदलत्या काळात निरनिराळ्या क्षेत्रांत संशोधन होणे गरजेचे आहे. मात्र हे करताना, त्यात नावीन्यता असणे गरजेचे आहे. प्रारंभी डॉ. साळुंखे यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनही भरविले. डॉ. मधुकर शेवाळे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.


दै. लोकमत
दि. १६/१०/१५
पृ. ७

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ LARC ज्ञानगंगोत्री, नाशिक

# वाचन प्रेरणेचे 'अग्निपंख'

## उपक्रम : अब्दुल कलाम जयंतीनिमित्ताने शाळांमध्ये वाचनाचा जागर

नाशिक : भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने शहरातील शाळांमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. शाळांमध्ये आज सामूहिक वाचन करण्यात आले. अनेक ठिकाणी कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, तर या दिनानिमित्त विविध स्पर्धात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काही शाळांमध्ये कलाम यांच्या जीवनावरील चित्रफीत दाखविण्यात आली. अनेक शाळांच्या प्रांगणात पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते, तर काही ठिकाणी ग्रंथालयांना पुस्तके भेट देण्याचाही उपक्रम राबविण्यात आला.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात कलाम यांच्या प्रतिमापूजनप्रसंगी कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. मधुकर शेवाळे, डॉ.राजेंद्र वडनेरे, प्रकाश अतकरे.

# ज्ञानासाठी वाचन आवश्यक

## मुक्त विद्यापीठ : कुलगुरु साळुंखे यांचे प्रतिपादन

नाशिक : ज्ञानाची नवीन निर्मिती करण्यासाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानामुळेच राष्ट्राची प्रगती होते. ज्ञानातूनच समाजाची निर्मिती होते. वाद, प्रतिवाद आणि वाचन असल्याशिवाय ज्ञानाची निर्मिती शक्य नाही, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ.

दै. पुण्यनगरी

दि. १६।१०।१५

पृष्ठ- पुरवणी-३

# ज्ञानाच्या निर्मितीसाठी वाचन आवश्यक : डॉ. साळुंखे



नाशिक, दि. १५ (प्रतिनिधी)- ज्ञानाची निर्मिती करण्यासाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानामुळेच राष्ट्राची प्रगती होते. ज्ञानातूनच समाजाची निर्मिती होते. वाद, प्रतिवाद आणि वाचन असल्याशिवाय ज्ञानाची निर्मिती शक्य नाही, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे प्रगत भारताचे स्वप्न साकारण्यासाठी त्यांचा जन्मदिन आज वाचन प्रेरणादिन म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्रात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे, निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. राजेंद्र वडनेरे आणि ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे होते.

प्रा. डॉ. साळुंखे पुढे म्हणाले, साधारण पाचव्या शतकात चंद्रगुप्त, आर्य भट्टांनी ज्ञान संपादनाचे मोठे कार्य केले. यानंतर दहाव्या शतकात ज्ञानाची जेवढी निर्मिती भारतात झाली तेवढी कोठेही झाली नाही. दरम्यान, तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात आर्यभट्टांच्या ज्ञान संपादनाला छेद देण्यात आला. परिणामी गरिबी मोठ्या प्रमाणात वाढल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. बदलत्या काळात निरनिराळ्या क्षेत्रात संशोधन होणे गरजेचे आहे. मात्र, हे करताना त्यात नावीन्यता असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना वाचनाचा छंद लागावा, यासाठी विविध कार्यक्रम राबविण्याच्या सूचना राज्य कुलगुरुंनी यावेळी केल्या. तद्वतच डॉ. कलाम यांच्या किमान एका पुस्तकाचे वाचन विद्यार्थ्यांनी, तसेच शिक्षकांनीही करायला हवे, असे ते म्हणाले. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश कसा शक्तिशाली होईल, असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ. कलाम नेहमी करीत होते. त्यांची प्रेरणा प्रत्येकाने घ्यायला पाहिजे, असेही कुलगुरू डॉ. साळुंखे यांनी शेवटी सांगितले.

प्रारंभी कुलगुरू प्रा. डॉ. साळुंखे यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनही भरविण्यात आले होते. डॉ. मधुकर शेवाळे यांनी सूत्रसंचालन व आभार व्यक्त केले. विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

LARC
ज्ञानगंगोत्री, नाशिक



# ी वाचन आवश्यक- डॉ. साळुंखे

प्रेरणा
व्हाण
ाजरा
ामित्त
य व
ोजित
ावेळी
ठाचे
तकरे,
ाखे चे
आणि
केंद्राचे
ते. प्रा.
ाधारण
आर्य
े कार्य



डॉ. कलाम जयंतीनिमित्त बोलताना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे

केले. यानंतर दहाव्या शतकात ज्ञानाची जेवढी निर्मिती भारतात झाली तेंवढी कोठेही झाली नाही. दरम्यान, तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात आर्यभट्टांच्या ज्ञान संपादनाला छेद देण्यात आला. परिणामी गरिबी मोठ्या प्रमाणात वाढल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. बदलत्या काळात निरनिराळ्या क्षेत्रात संशोधन होणे गरजेचे आहे. मात्र हे करताना, त्यात नाविन्यता असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना वाचनाचा छंद लागावा, यासाठी विविध कार्यक्रम राबविण्याच्या सूचना कुलगुरूंनी यावेळी केल्या. तद्वतच डॉ. कलाम यांच्या किमान एका पुस्तकाचे वाचन विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनीही करायला हवे असे ते म्हणाले. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश कसा शक्तिशाली होईल, असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम नेहमी करीत होते. त्यांच्या कामाची प्रेरणा प्रत्येकाने घ्यायला पाहिजे, असेही कुलगुरू डॉ. साळुंखे यांनी शेवटी सांगितले. प्रारंभी कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनही भरविण्यात आले होते. डॉ. मधुकर शेवाळे यांनी सूत्रसंचालन करून शेवटी उपस्थितांचे आभार मानले. विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.